महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बॅंक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५
ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

# ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय सेवा, गट-अ

**क्रमांक:१५(२)(२२०)/१५३६/सात** **जाहिरात क्रमांक: ००१/२०२१**

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाअंतर्गत **ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय सेवा, गट-अ** पदावरील भरतीसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**२. एकूण पदसंख्या:-१**

| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | इ.मा.व. | एकुण मागासवर्गीय | अराखीव | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| महिला (३०%) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| खेळाडू (५%) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |

**३. पात्रतेचे निकष:-**

**३.१ भारतीय नागरिकत्व**

**३.२ वयोमर्यादा :-**

३.२.१ किमान व कमाल वयोमर्यादा:-

| वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | किमान वय | कमाल वय | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सर्वसाधारण / महिला | | प्राविण्य प्राप्त खेळाडू | | माजी सैनिक | | दिव्यांग उमेदवार |
| | | अमागास | मागासवर्गीय/ अनाथ | अमागास | मागासवर्गीय/ अनाथ | अमागास | मागासवर्गीय/ अनाथ | |
| १ सप्टेंबर, २०२१ | १८ | ४० | ४५ | ४३ | ४५ | सैनिकी सेवेचा कालावधी अधिक ३ वर्षे | | ४५ |

३.२.२ मागासवर्गीय आणि खेळाडू व्यक्तींसाठी वयोमर्यादेतील शिथिलतेसंदर्भातील अनुज्ञेय सवलतींपैकी अधिकतम एकच सवलत देय राहील.

३.२.३ महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील पात्र कर्मचाऱ्यांना उच्च वयोमर्यादा लागू नाही.

३.२.४ अपवादात्मक शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अपवादात्मक अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा शिथिल करण्याविषयी आयोगाकडून विचार करण्यात येईल. परंतु, आयोगाच्या कार्यनियमावलीतील तरतुदीनुसार जेव्हा मुलाखतीसाठी पुरेसे उमेदवार प्राप्त होत नसतील, तेव्हाच हा नियम विचारात घेतला जाईल.

३.२.५ अशा प्रत्येक प्रकरणी उपलब्ध उमेदवारांच्या उच्चतम शैक्षणिक अर्हतेच्या दोन स्तर उच्च शैक्षणिक अर्हताप्राप्त उमेदवारच वयोमर्यादेत सवलतीकरीता विचारात घेतले जातील.

३.२.६ अनुभवाच्या संदर्भात ज्या पदावरील किमान अनुभव मागितला असेल त्यापेक्षा वरिष्ठ पदावरील अनुभव वयोमर्यादा शिथिलीकरण्याकरीता विचारात घेतला जाईल.

**३.३ शैक्षणिक अर्हता:-**

३.३.१ Possess a Master's Degree in Arts, Science, Law or Commerce of any statutory University And

३.३.२ Possess a Degree or Diploma in Library Science of any statutory University And

३.३.३ Have sound knowledge of Marathi.

**AND THEREAFTER**

**३.४ अनुभव:-**

३.४.१ Possess Practical experience or research experience or both in the working of libraries for not less than ten years in any large library,

३.४.२ The practical experience as mentioned herein above should have been gained after acquiring the Degree or Diploma in Library Science of any Statuary University.

**३.५ प्राधान्यशील अर्हता:-**

३.५.१ Preference may be given to candidates who have Administrative experience for a period of atleast five years in any large Library.

**३.६** शासन पत्र, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक- मराग्र/२००६/२५३/०६ साशि-५, दिनांक २९ मे, २००८ अन्वये प्राप्त अभिप्रायानुसार प्रत्यक्ष अनुभव, मोठे ग्रंथालय व प्रशासकीय अनुभव याबाबतची व्याख्या खालीलप्रमाणे आहे:-

(१)प्रत्यक्ष अनुभव (Practical Experience) म्हणजे, ग्रंथालयीन कामकाजाच्या सेवांचे नियमन आणि व्यवस्थापन याबाबतच्या प्रत्यक्ष कामाचा अनुभव.

(२) मोठे ग्रंथालय (Large Library) म्हणजे, विद्यापीठाचे ग्रंथालय, महाविद्यालयीन ग्रंथालय किंवा तत्सम ग्रंथालय.

(३) प्रशासकीय अनुभव (Administrative Experience)म्हणजे, आस्थापना विषयक, सेवाप्रवेश, नियुक्ती, पदोन्नती, बदली इत्यादी संदर्भातील महाराष्ट्र नागरी सेवा नियम व लेखाविषयक कार्यालयीन कामकाज तसेच याबाबत नियोजन, नियंत्रण आणि प्रशिक्षण इत्यादी विषयक सर्वसाधारण माहिती असणे आवश्यक आहे.

**३.७ शैक्षणिक अर्हता व अनुभवाचा कालावधी गणना करण्याचा दिनांक:-**

३.७.१ प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्याकरीता विहित केलेल्या अंतिम दिनांकास संबंधित शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक राहील.

३.७.२ अनुभवाच्या कालावधीची गणना प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्याकरीता विहित केलेल्या अंतिम दिनांकास करण्यात येईल.

**४. निवड प्रक्रिया:-**

४.१ प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून, किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरिता पात्र असणार नाही.

४.२ जाहिरातीस अनुसरून प्राप्त अर्जाची संख्या आयोगाच्या कार्यनियमावलीतील तरतुदीनुसार वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोयीस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टीने जाहिरातीमध्ये नमूद शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता/अनुभव किंवा अन्य योग्य निकष यांच्या आधारे अथवा चाळणी परीक्षेद्वारे मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल.

४.३ चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि / अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही.

४.४ चाळणी परिक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी (लागू असल्यास) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

४.५ चाळणी परीक्षा घेतल्यास चाळणी परीक्षेचे गुण व मुलाखतीचे गुण एकत्रितरित्या विचारात घेऊन तर चाळणी परीक्षा न झाल्यास केवळ मुलाखतीच्या गुणांच्या आधारे उमेदवाराची शिफारस करण्यात येईल.

४.६ मुलाखतीमध्ये किमान ४१% व त्यापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या उमेदवारांचाच शिफारशीसाठी विचार केला जाईल.

४.७ सेवाभरतीबाबतची संपूर्ण प्रक्रिया ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य (सेवाप्रवेश नियम) १९७७ आणि तद्नंतर शासनाकडून वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणा तसेच आयोगाच्या कार्यनियमावलीतील तरतुदीनुसार राबविण्यात येईल.

**५. अर्ज करण्याची पद्धत:-**

**५.१** अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील.

**५.२** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mpsconline.gov.in तसेच https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**५.३** आयोगास अर्ज सादर करताना माध्यमिक शालांत प्रमाणपत्रावर असलेल्या नावाप्रमाणेच नोंदणी करणे व आयोगास अर्ज सादर करणे अनिवार्य आहे.

**५.४** अर्ज सादर करण्याकरीता संकेतस्थळ :- https://mpsconline.gov.in

**५.५ अर्ज सादर करण्याचे टप्पे:-**

५.५.१ आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीवर यापुर्वी विहित पध्दतीने नोंदणी केली नसल्यास नोंदणी करुन खाते (Profile) तयार करणे.

५.५.२ खाते तयार केलेले असल्यास व ते अदययावत करण्याची आवश्यकता असल्यास अदययावत करणे.

५.५.३ विहित कालावधीत व विहित पध्दतीने अर्ज सादर करणे.

५.५.४ परीक्षा शुल्काचा भरणा विहित पध्दतीने करणे.

**५.६** अर्ज सादर करण्याचा कालावधी:- **दिनांक २८ मे, २०२१ रोजी दुपारी १४:०० ते २५ जून, २०२१ रोजी २३.५९ वाजेपर्यंत.**

**५.७** आयोगास अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**५.८ शुल्क रुपये:**

५.८.१ अमागास- रुपये ७१९/-

५.८.२ मागासवर्गीय व अनाथ - रुपये ४४९/

५.८.३ उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील.

५.८.४ परीक्षा शुल्क ना परतावा (Non-refundable) आहे.

**५.९** परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा:-

५.९.१ शुल्क भरण्याकरिता मुख पृष्ठावरील 'माझे खाते' या लिंक वर क्लिक करावे.

५.९.२ 'माझे खाते' या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. 'Unpaid' लिहिलेल्या जाहिरात / पद / परीक्षेसमोर ' Pay Now' अशी लिंक उपलब्ध असेल.

५.९.३ 'Pay Now' या लिंक वर क्लिक केल्यानंतर तीन पर्याय उपलब्ध होतील:- (१) ऑनलाईन पेमेंट (२) चलनाद्वारे

५.९.४ क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, युपीआय अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन परीक्षा शुल्क अदा करता येईल.

५.९.५चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

५.९.६ भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर केल्यास त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

५.९.७ ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणे तसेच भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेणे याकरीता विहित अंतिम **दिनांक २५ जून २०२१ रोजी २३.५९ वाजेपर्यंत**.

५.९.८ चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये शुल्क भरण्याचा अंतिम **दिनांक २८ जून,२०२१** - बँकेच्या कार्यालयीन वेळेत.

५.९.९ ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा झाला आहे किंवा कसे याची स्थिती (status) लगेचच अवगत होईल. ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरले असल्याबाबत Logout करण्यापूर्वीच खात्री करणे अथवा परीक्षा शुल्काचा भरणा झाल्याबाबतची स्थिती उपलब्ध नसल्यास पुन्हा शुल्क भरण्याची अथवा चलन घेण्याबाबतची कार्यवाही प्रस्तुत परीक्षेच्या अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीच करणे आवश्यक आहे.

**६. संवर्ग/पद तसेच आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तपशील:-**

**६.१ सर्वसाधारण:-**

**६.१.१ वेतनश्रेणी**: एस-२५ रुपये ७८,८०० - २,०९,२००/- अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते

**६.१.२ कर्तव्ये व जबाबदा-या**:- प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-या याबाबतचा तपशील आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**६.१.३** सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करणेबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल. याबाबतचा तपशील वेळोवेळी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**६.१.४** अराखीव (खुला) पदाकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषासंदर्भातील अटींची पुर्तता करणा-या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरीता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

**६.२ आरक्षण:-**

विविध मागास प्रवर्ग, महिला, प्राविण्यप्राप्त खेळाडू, अनाथ इत्यादींसाठी सामाजिक व समांतर आरक्षण शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार राहील.

**६.३ दिव्यांग व्यक्तींचे आरक्षण:-**

**६.३.१** शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक मराग्रं-२०२१/प्र.क्र.२६/साशि-५, दिनांक १७ फेब्रुवारी, २०२१ नुसार प्रस्तुत ग्रंथालय संचालक संवर्गाकरीता पदाची सुनिश्चिती राहील.

**६.३.२** दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६ अ, दिनांक २९ मे, २०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

**६.३.३** दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in या संगणकीय प्रणालीदवारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे अनिवार्य आहे.

**७.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीप्रकियेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' द्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती अधिकृत समजण्यात येईल.

**८.** सविस्तर जाहिरात आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

ठिकाण : मुंबई.
दिनांक : २७ मे, २०२१

उप सचिव, सरळ सेवा
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.
(२) मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्र सादर न केल्यास सदर परीक्षेची उमेदवारी नाकारली जाईल.